रजिस्ट्री सं. डी. 221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1] नई दिल्ली, 23 जनवरी 2003/3 माघ (शके) 1924 [खण्ड 12
No. 1] NEW DELHI, 23RD JANUARY 2003/3 MAGHA (SAKA) 1924 [Vol. 12
अंक १] नवी दिल्ली, २३ जानेवारी २००३/३ माघ (शके) १९२४ [खंड १२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 23 जनवरी 2003/3 माघ (शके) 1924

(1) दि टॅक्सेशन लॉज (एक्स्टेन्शन टू जम्मू अॅण्ड कश्मीर) अॅक्ट, 1954, (2) दि स्पाइसेस, अॅक्ट, 1986, (3) दि कमिशन ऑफ सती (प्रिव्हेन्शन) अॅक्ट, 1987, (4) दि जजेस (प्रोटेक्शन) अॅक्ट, 1985, (5) दि इलेक्शन कमिशन (कंडिशन्स ऑफ इलेक्शन कमिशनर्स अॅण्ड ट्रॅन्झॅक्शन ऑफ बिझ्नेस) अॅक्ट, 1991, (6) दि आर्मड फोर्सेस (जम्मू अॅण्ड कश्मीर) स्पेशल पॉवर अॅक्ट, 1990, (7) दि अॅग्रिकल्चरल अॅण्ड प्रोसेस फूड प्रॉडक्ट्स एक्सपोर्ट सेस अॅक्ट, 1985, (8) दि ओपिअम अॅन्ड रेव्हेन्यू लॉज (एक्स्टेन्शन ऑफ अॅप्लिकेशन) अॅक्ट, 1950, (9) दि रेव्हेन्यू रिकव्हरी अॅक्ट, 1890, (10) दि नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लासेस अॅक्ट, 1993, (11) दि रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेस अॅक्ट, 1986, (12) दि नॅशनल कमिशन फॉर माइनॉरिटिज अॅक्ट, 1992, (13) दि लॉटरिज (रेग्युलेशन) अॅक्ट, 1998, (14) दि अॅग्रिकल्चरल प्रोडयूस सेस अॅक्ट, 1940, (15) दि बेनामी ट्रॅन्झेक्शन्स (प्रोहिबिशन) अॅक्ट, 1988, (16) दि पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, 1936; के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जाएंगे ।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

## (LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 23rd January 2003/ 3 Magha (Saka) 1924

The Translations in Marathi of the (1) The Taxation Laws (Extension to Jammu and Kashmir) Act, 1954, (2) The Spices Cess Act, 1986, (3) The Commission of Sati (Prevention) Act, 1987, (4) The Judges (Protection) Act, 1985, (5) The Election Commission (Conditions of Service of Election Commissioners and Transaction of Business) Act, 1991, (6) The Armed Forces (Jammu and Kashmir) Special Powers Act, 1990, (7) The Agricultural and Processed Foods Products Export Cess Act, 1985, (8) The Opium and Revenue Laws (Extension of Application) Act, 1950, (9) The Revenue Recovery Act, 1890, (10) The National Commission for Backward Classes Act, 1993, (11) The Research and Development Cess Act, 1986, (12) The National Commission for Minorities Act, 1992, (13) The Lotteries (Regulation) Act, 1998, (14) The Agricultural Produce Cess Act, 1940, (15) The Benami Transactions (Prohibition) Act, 1988, (16) The Payment of Wages Act, 1936 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

## (विधायी विभाग)

नवी दिल्ली, दिनांक २३ जानेवारी २००३/३ माघ (शके) १९२४

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि टॅक्सेशन लॉज (एक्स्टेन्शन टू जम्मू अॅन्ड काश्मीर) अॅक्ट, १९५४, (२) दि स्पाइसेस अॅक्ट, १९८६, (३) दि कमिशन ऑफ सती (प्रिव्हेन्शन) अॅक्ट, १९८७, (४) दि जजेस (प्रोटेक्शन) अॅक्ट, १९८५, (५) दि इलेक्शन कमिशन (कंडिशन ऑफ इलेक्शन कमिशनर्स अॅन्ड ट्रॅन्झॅक्शन ऑफ बिझनेस) अॅक्ट, १९९१, (६) दि आर्मड फोर्सेस (जम्मू अॅन्ड काश्मीर) स्पेशल पॉवर अॅक्ट, १९९०, (७) दि अॅग्रिकल्चरल अॅन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस् एक्सपोर्ट सेस अॅक्ट, १९८५ (८) दि ओपिअम अॅन्ड रेव्हेन्यू लॉज (एक्स्टेन्शन ऑफ अॅप्लिकेशन) अॅक्ट, १९५० (९) दि रेव्हेन्यू रिकव्हरी अॅक्ट, १८९०, (१०) दि नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लासेस अॅक्ट, १९९३, (११) दि रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेस अॅक्ट, १९८६, (१२) दि नॅशनल कमिशन फॉर माइनॉरिटिज अॅक्ट, १९९२, (१३) दि लॉटरिज् (रेग्युलेशन) अॅक्ट, १९९८, (१४) दि अॅग्रिकल्चरल प्रोड्यूस सेस अॅक्ट, १९४०, (१५) दि बेनामी ट्रॅन्झॅक्शन्स (प्रोहिबिशन) अॅक्ट, १९८८, (१६) दि पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, १९३६; या अधिनियमांचे मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ (१९७३ चा अधिनियम क्रमांक ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हे अनुवाद त्या अधिनियमांचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

# निर्देशसूची
# INDEX


| अ. क्र. Sr. No. | अधिनियमाचे नाव Name of the Act | पृष्ठ क्रमांक Page No. |
|---|---|---|
| १<br>1 | कराधान विधि (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४ ..<br>The Taxation Laws (Extension to Jammu and Kashmir) Act, 1954 | ४ |
| २<br>2 | मसाला पदार्थ उपकर अधिनियम, १९८६<br>The Spices Cess Act, 1986 | ९ |
| ३<br>3 | सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७<br>The Commission of Sati (Prevention) Act, 1987 | ११ |
| ४<br>4 | न्यायाधीश (संरक्षण) अधिनियम, १९८५<br>The Judges (Protection) Act, 1985 | १७ |
| ५<br>5 | निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवा शर्ती आणि कामकाज चालवणे) अधिनियम, १९९१ ..<br>The Election Commission (Conditions of Service of Election Commissioners and Transaction of Business) Act, 1991 .. | १८ |
| ६<br>6 | सशस्त्रदल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अधिनियम, १९९०<br>The Armed Forces (Jammu and Kashmir) Special Powers Act, 1990 | २१ |
| ७<br>7 | कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५<br>The Agricultural and Processed Food Products Export Cess Act, 1985 | २३ |
| ८<br>8 | अफू व महसूल कायदे (प्रयुक्ति क्षेत्राचे विस्तारण) अधिनियम, १९५०<br>The Opium and Revenue Laws (Extension of Application) Act, 1950 | २४ |
| ९<br>9 | महसूल वसुली अधिनियम, १८९०<br>The Revenue Recovery Act, 1890 | २८ |
| १०<br>10 | राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अधिनियम, १९९३<br>The National Commission for Backward Classes Act, 1993 | ३२ |
| ११<br>11 | संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६<br>The Research and Development Cess Act, 1986 | ३६ |
| १२<br>12 | राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, १९९२<br>The National Commission for Minorities Act, 1992 | ३८ |
| १३<br>13 | लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८<br>The Lotteries (Regulation) Act, 1998 | ४२ |
| १४<br>14 | कृषि उत्पादन उपकर अधिनियम, १९४०<br>The Agricultural Produce Cess Act, 1940 | ४५ |
| १५<br>15 | बेनामी संव्यवहार (प्रतिषेध) अधिनियम, १९८८<br>The Benami Transaction (Prohibition) Act, 1988 | ४९ |
| १६<br>16 | वेतन प्रदान अधिनियम, १९३६<br>The Payment of Wages Act, 1936 | ५१ |

# लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८

## (१९९८ चा अधिनियम क्रमांक १७)

(३१ जानेवारी २००२ रोजी यथाविद्यमान)

[७ जुलै, १९९८]

**लॉटरीचे विनियमन आणि त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबी यासाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम :—**

भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास, "लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८" असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो २ ऑक्टोबर, १९९७ रोजी अंमलात आला असल्याचे मानले जाईल.

२. या अधिनियमात विषयानुसार किंवा संदर्भानुसार काही प्रतिकूल नसेल तर,— व्याख्या.

(क) "लॉटरीची भव्यतम सोडत" याचा अर्थ, लॉटरीची एखाद्या सणाच्या किंवा अन्य विशेष प्रसंगाच्या दिवशी किंवा काळात आयोजित करण्यात आलेली विशेष लॉटरी सोडत, असा असून इतर सामान्य लॉटरी सोडतीच्या देऊ केलेल्या बक्षिसाच्या रकमेपेक्षा यावेळी देऊ केलेली बक्षिसाची रक्कम जास्त असते ;

(ख) "लॉटरी" याचा अर्थ, तिकिटे खरेदी करून बक्षिसे मिळवण्याची संधी घेणाऱ्या व्यक्तींना चिठ्ठ्या टाकून किंवा संभाव्यताद्वारा बक्षिसे देण्याची कोणत्याही स्वरूपातील व कोणत्याही नावाने ओळखली जाणारी योजना, असा आहे ;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

३. कलम ४ मध्ये उपबंधित केले असेल ते खेरीज करून कोणतेही राज्य शासन, कोणत्याही लॉटरीचे व्यवस्थापन, आयोजन, किंवा प्रचालन करणार नाही. लॉटरीस मनाई.

४. राज्य शासन, खालील शर्तींच्या अधीन राहून, लॉटरीचे व्यवस्थापन, आयोजन व प्रचालन करील :— ज्यांच्या अधीन राहून लॉटरीचे व्यवस्थापन करावयाचे त्या शर्ती.

(क) पूर्वघोषित क्रमांकाला किंवा अंकाच्या आधारे कोणतेही बक्षीस देण्यात येणार नाही ;

(ख) ज्यामुळे लॉटरी तिकिटांच्या अधिप्रमाणनाविषयी खात्री पटेल अशा प्रकारे राज्य शासन, त्या तिकिटावर मुद्रा व शब्दसंक्षेप चिन्ह उमटवून तिकिटांची छपाई करील ;

(ग) राज्य शासन, एकतर स्वतः किंवा वितरकांमार्फत किंवा विक्री अभिकर्त्यांमार्फत तिकिटांची विक्री करील ;

(घ) लॉटरी तिकिटांच्या विक्रीचे उत्पन्न राज्याच्या लोक लेख्यात जमा करण्यात येईल ;

(ङ) लॉटरीच्या सर्व सोडतींचे आयोजन स्वतः राज्य शासन करील ;

(च) राज्य शासन विहित करील अशा कालावधीत बक्षिसाची न मागितलेली किंवा अन्यथा वितरित न झालेली रक्कम राज्य शासनाची मालमत्ता होईल ;

(छ) सोडतीचे ठिकाण हे संबंधित राज्यामध्ये स्थित असेल ;

(ज) कोणत्याही लॉटरीच्या एका आठवड्यात एकापेक्षा जास्त सोडती असणार नाहीत ;

(झ) सर्व प्रकारच्या लॉटरीच्या सोडती, राज्य शासन, दिवसातील विहित करील अशा वेळेदरम्यान आयोजित केल्या जातील ;

(ञ) लॉटरीच्या भव्यतम सोडतींची संख्या ही एका कॅलेंडर वर्षात सहापेक्षा अधिक असणार नाही ;

(ट) केंद्र सरकार विहित करील अशा इतर सर्व शर्ती.

५. राज्य शासन, राज्यात, इतर राज्यांनी व्यवस्थापन केलेल्या, आयोजित केलेल्या किंवा प्रचालन केलेल्या लॉटरीच्या तिकिटांच्या विक्रीस प्रतिबंध करू शकेल. राज्यात तिकीट विक्रीस प्रतिबंध.

६. केंद्र सरकार, शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे कलम ४ च्या उपबंधाचे उल्लंघन करून करण्यात आलेले लॉटरीचे व्यवस्थापन, आयोजन किंवा प्रचालन यास किंवा जेथे कलम ५ च्या उपबंधांचे उल्लंघन करून विक्री करण्यात येईल तेथे त्या विक्रीस प्रतिबंध करू शकेल. लॉटरीचे व्यवस्थापन, इत्यादीला मनाई.

शास्ती. ७. (१) जेव्हा शासनाच्या कोणत्याही विभागाकडून एखाद्या लॉटरीचे व्यवस्थापन, आयोजन किंवा प्रचालन, या अधिनियमास राष्ट्रपतींची मान्यता प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतर या अधिनियमाच्या उपबंधांचे उल्लंघन करून करण्यात आलेले असेल तेव्हा, विभागप्रमुख दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल:

परंतु, या कलमामधील कोणत्याही गोष्टीमुळे, अशा विभागप्रमुखास, जर त्याने असे उल्लंघन त्याच्या नकळत झाले आहे, किंवा उल्लंघनाच्या कृतीला प्रतिबंध करण्यासाठी त्याने यथोचित खबरदारी घेतली होती, हे सिद्ध केले तर, तो कोणत्याही शिक्षेस पात्र ठरवला जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जेथे या अधिनियमाखालील उल्लंघन शासनाच्या विभागाकडून घडले असेल आणि विभागप्रमुखाखेरीज अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्याने ते घडले आहे, व त्याच्या हयगयीमुळे घडले आहे, असे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा अधिकारीदेखील त्या उल्लंघनाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल व त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

(३) जर या अधिनियमाच्या उपबंधांचे उल्लंघन करून खरेदी केल्या जाणाऱ्या, आयोजण्यात किंवा प्रचालन करण्यात येणाऱ्या कोणत्याही लॉटरीमध्ये एखादी व्यक्ती, अभिकर्ता किंवा प्रचालक किंवा व्यापारी म्हणून काम करील किंवा अशा लॉटरीचे तिकिट खरेदी करील किंवा वितरित करील, ती दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

अपराध दखली व बेजमानती असणे. ८. ह्या अधिनियमाखालील अपराध हे दखली व बेजमानती अपराध असतील.

कंपन्यांनी केलेले अपराध. ९. (१) जेथे या अधिनियमाखालील अपराध कंपनीकडून घडला असेल तेथे, अपराध घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाजाचा प्रभार असलेली व कामकाजाबाबत जबाबदार असलेली अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी, अशा अपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास पात्र असेल:

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने जर, तिच्या नकळत अपराध घडला होता किंवा अशा अपराधास प्रतिबंध करण्यासाठी तिने यथोचित सर्व खबरदारी घेतली होती, हे सिद्ध केले तर, ती या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही शिक्षेस पात्र ठरवली जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध, कंपनीने केलेला असेल आणि तो, कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मुकानुमतीने करण्यात आला आहे अथवा त्याच्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे, असे शाबीत झाले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हे सुद्धा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ते पात्र होतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यात भागीदारी संस्था किंवा अन्य व्यक्ती संघाचा समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा भागीदारी संस्थेच्या संबंधातील अर्थ, त्यातील भागीदार, असा आहे.

निदेश देण्याची शक्ती. १०. केंद्र सरकार, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी, राज्य शासनाला निदेश देईल.

केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती. ११. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमातील प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) केंद्र सरकारकडून करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

१२. (१) राज्य शासन या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, अशा नियमांत खालील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी उपबंध करता येतील, ते असे :—

(क) कलम ४, खंड (च) खाली बक्षिसाच्या रकमेसाठी मागणी करण्याबाबत वेळ निश्चित करणे;

(ख) कलम ४ खंड (झ) खाली सर्व लॉटरीच्या सोडती काढण्यासाठी कालावधी निश्चित करणे; आणि

(ग) विहित करणे आवश्यक असेल अशा किंवा विहित करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही बाबी.

(३) राज्य शासनाकडून, या कलमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्या-नंतर होईल तितक्या लवकर, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे, त्याच्या प्रत्येक सभागृहासमोर किंवा जेथे ते एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेथे, त्या सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

१३. (१) "लॉटरी (विनियमन) अध्यादेश, १९९८" याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे समजले जाईल.